## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

### कार्यालयीन सुचना

क्र.संगाबाअवि/१/१०३/[illegible]/२०२२ दिनांक : [illegible] मार्च, २०२२

**संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/(७५/२१)/(१)/मशि-३,दिनांक २२ ऑक्टोबर,२०२१**
**२) कार्यालयीन अधिसुचना क्रमांक ३०/२०२२, दिनांक १९ मार्च, २०२२**
**३) कार्यालयीन आदेश क्रमांक संगाबाअवि/१/१०३/३-२६७/२०१९,दिनांक ०६ मार्च, २०१९**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैद्धांतिक, प्रात्यक्षिके इत्यादी कामांकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या अभ्यांगत / तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात सुधारणा केलेली आहे. सदर शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ च्या व्यवस्थापन परिषदेसमोर विषय क्रमांक १८ अन्वये सादर केला असता, त्याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली आहे. यासंदर्भातील अधिसुचना संदर्भ क्रमांक २ नुसार प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

यासोबत संदर्भीय क्रमांक १ वरील शासन निर्णयाची प्रत व संदर्भीय क्रमांक २ वरील अधिसुचनेची प्रत अवलोकनार्थ जोडण्यात आलेली आहे. सदर्हु सुधारीत दर दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासून विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांना व मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा यांना अनुज्ञेय राहतील. यापूर्वी संदर्भ क्रमांक ३ वरील प्रसिध्द कार्यालयीन आदेशातील शासन निर्णय दि. १४/११/२०१८ अन्वये लागू करण्यात आलेल्या अटी, शर्ती व इतर बाबी यथास्थिती कायम राहतील.

आदेशान्वये -

सहपत्र : शासन निर्णय
कार्यालयीन अधिसुचना

कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

प्रत माहीती व आवश्यक कार्यवाहीस्तव

१. विभागप्रमुख / समन्वयक / संचालक,
सर्व शैक्षणिक विभाग / मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२. वित्त व लेखाधिकारी,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३. उपकुलसचिव (लेखा),
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

Aditi/letter of CHB 6

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

( असाधारण )

शनिवार, दिनांक १९ मार्च, २०२२

अधिसुचना

दिनांक : १९ मार्च, २०२२

क्र. ३०/२०२२

विषय :- शासकीय /अशासकीय अनुदानित महाविद्यालय / संस्थेमधील अभ्यागंत / तासिका तत्वावरील नियुक्त शिक्षकांचे मानधन वाढीबाबत शासन निर्णय तसेच सदर शासन निर्णयामधील मानधानाचे दर विना अनुदानित महाविद्यालयांना लागू करण्याबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्र. संक्रिर्ण – २०२१/(७५/२१)/१/मशि-३, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने उपरोक्त विषयान्वये शासन निर्णय क्र. टीईटी – २००८ (१८३/०८)/तशि-३, दिनांक ५ नोव्हेबर २००८ निर्गमित केले आहे.

आणि

ज्याअर्थी शासनाने सुधारीत शासन निर्णय क्र. २०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ निर्गमित केले आहे.

आणि

ज्याअर्थी विद्यापीठाने वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्व अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयासाठी विनियम क्र. ०२/२०२० दि.२७ ऑगस्ट, २०२० निर्गमित केले आहे.

आणि

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भाकित शासन निर्णय निर्गमित करुन सर्व शासकीय/अशासकीय अनदानित महाविद्यालयामधील अभ्यागंत / तासिका तत्वावरील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षकांचे मानधनात दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासुन वाढ केली आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांची माहिती व त्यानुसार कार्यवाहीस्तव अधिसुचित करण्यात येत आहे की,

१) उपरोक्त शासन निर्णय सर्व संबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयाला लागू करण्यात आला आहे. तसेच अशासकीय विना अनुदानित महाविद्यालयांना सदर वाढीव दर व्यवस्थापन परिषदेने दिनांक २२/०२/२०२२ च्या सभेत विषय क्र. १८ अन्वये लागु केले आहे.

**शासनाने वाढ केले सुधारीत दर खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | सुधारीत दर (प्रति तासाकरीता) | |
|---|---|---|---|
| | | सैध्दांतिक | प्रात्यक्षिके |
| १ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | रु. ६२५/- | रु. २५०/- |
| २ | कला, वाणिज्य विज्ञान (पदव्युत्तर) | रु. ७५०/- | रु. ३००/- |
| ३ | शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षण (पदवी/पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु. ७५०/- | रु. ३००/- |
| ४ | विधी (पदवी /पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमा) | रु.७५०/- | रु. ३००/- |

२) सदरहु सुधारीत दर दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासुन अनुज्ञेय राहील.

३) वरील सुधारीत दर खालील अटींच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आले आहे.

(अ) शासकीय महाविद्यालये/संस्था यामधील अभ्यांगत/तासिका तत्वावरील शिक्षकांसाठी उपरोक्त दिनांक ५ नोव्हेबर, २००८ च्या शासन निर्णयामधील नमुद अटी कायम राहतील.

(ब) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी अभ्यांगत/तासिक तत्वावरील शिक्षकांना उपरोक्त दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद अटी कायम राहतील, आणि विना अनुदानित महाविद्यालयाला सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद सर्व अटी (अट क्र. २,७ व ११ वगळुन) लागु राहतील.

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/ संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/ तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२१/(७५/२१)/(१)/मशि-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२१.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५, दिनांक ०५ नोव्हेंबर,२००८.

२) शासन निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८.

प्रस्तावना :

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैध्दांतिक, प्रात्याक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये लागू करण्यात आलेले मानधनाचे दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वांगीन विचार करुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | सुधारित दर (प्रति तासाकरीता) | |
|---|---|---|---|
| | | सैद्धांतिक | प्रात्याक्षिके |
| १ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | रु.६२५/- | रु.२५०/- |
| २ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदव्युत्तर) | रु.७५०/- | रु.३००/- |
| ३ | शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- |
| ४ | विधी (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- |

२. सदरहू सुधारित दर दिनांक ०१ ऑक्टोंबर, २०२१ पासून अनुज्ञेय होतील.

३. वरील सुधारीत दर पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१) शासकीय महाविद्यालये/संस्था यामधील अभ्यागत/तासिका तत्वावरील अध्यापकांसाठी संदर्भाधिन क्र.१) येथील शासन निर्णय, दिनांक ०३/११/२००८ मधील नमूद अटी कायम राहतील.

२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत/तासिका तत्वावरील अध्यापकांना संदर्भाधिन क्र.२) येथील शासन निर्णय, दिनांक १४/११/२०१८ मधील परि.क्र.२ मध्ये नमूद अटी कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.८२०/२०२१/व्यय-५, दिनांक ०८/०९/२०२१ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र. २०२११०२२१८३२५२७८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra,
[illegible]
33722d42e0976d82a8, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2021.10.22 18:36:39 +05'30'

(हे.पं.बाविस्कर)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी.
८. निवड नस्ती, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.